# महाराष्ट्र शासन
गृह विभाग
## जिल्हा समादेशक होमगार्ड,सातारा यांचे कार्यालय
इंदुमती निवास, २६३/ब/२,भैरोबा मंदिर चौक,गोडोली,सातारा - ४१५००१
Mail ID :- dchgsatara@yahoo.com
फोन (०२१६२) - २२२०८२


जा.क्र.जिहोगा/ प्रशि / १०० /२०२४ दिनांक :- १५ / ०९ /२०२४

## प्रशिक्षण बाबत जाहीर सुचना

सातारा जिल्हयातील होमगार्ड नोंदणी-२०२४ मध्ये अंतिम निवड झालेल्या **महिला उमेदवारांचे ३५ दिवसांचे प्राथमिक प्रशिक्षण दि २३/०९/२०२४ ते दि.२७/१०/२०२४ अखेर पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची जि. सांगली येथे आयोजित केले आहे.**

हमीपत्र भरुन दिलेल्या व प्रशिक्षणांस जाणेस सहमती दर्शविलेल्या **सर्व महिला उमेदवारांना कळविणेत येते कि, सदर प्रशिक्षणांस जाणेकरीता सर्व तयारीनिशी दि. २२/०९/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. आपआपले पथक कार्यालयामध्ये उपस्थित रहावे. जे उमेदवार प्रशिक्षण करीता येणार नाहीत. अशा उमेदवारांची निवड रदद केली जाईल.** आपणांस एकत्र तुरची येथे रवाना केले जाईल. कोणीही परस्पर तुरची येथे रवाना होणार नाही. सर्व उमेदवारांना तुरची येथे दाखल करणेची जबाबदारी पथकप्रमुखांची राहील. त्यांनी आपले अधिनस्त अधिकारी याकरीता तैनात करावेत.

उमेदवारांनी सोबत आपले ४ फोटो, आधारकार्ड, पॅनकार्ड सोबत ठेवावे. तसेच निवासाकरीता आवश्यक साहित्य (बेडशिट, चादर, चप्पल, इ.) प्रशिक्षण गणवेश (पांढरा टि-शर्ट-२ नग, खाकी पँट, नेव्ही ब्लू रंगाची ट्रॅक पँट, लाल पी टी शुज , संपुर्ण गणवेश संच ) सोबत ठेवावे.

प्रशिक्षणकरीता येणे- जाणेचा खर्च उमेदवारांनी स्वत: करावयाचा आहे. तसेच प्रशिक्षण कालावधीमधील भोजनखर्च उमेदवारांनी स्वत: प्रशिक्षण केंद्र येथे जमा करावयाचा असून शासनाकडून अनुज्ञेय असणारा भोजनभत्ता व खिसाभत्ता प्रशिक्षण शिबीर संपलेनंतर आपले बँक खातेमध्ये जमा करणेत येईल. गणवेश किट भत्ता प्राथमिक प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर आपली उपस्थिती पडताळून अदा करणेत येईल.

**पुरुष उमेदवारांचे प्रशिक्षण सातारा जिल्हयामध्येच आयोजित केले जाईल याबाबत सविस्तर सुचना लवकरच कळविणेत येईल.** याकरीता पथक कार्यालयाशी संपर्कात रहावे. निवड झालेले बरेच उमेदवार होमगार्ड सदस्यत्व नाकारत असल्याने प्रतिक्षायादीतील उमेदवारांची गुणाणुक्रमे निवड केली जात असून प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी आपले पथक कार्यालयाशी सतत संपर्कात रहावे.

**मा . जिल्हा समादेशक होमगार्ड, सातारा यांचे आदेशान्वये...**